वाचा: १) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३०.

२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-स्थानिले-१०१०/प्र.क्र.-२६-ब/विमा प्रशा, दि.३१/०३/२०११.

---

स्था.१८/ब/अहवाल शाखा/वलेपअहवाल/न.क्र.१८३-३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०५ /२०१९, दिनांक -** 26 SEP 2019

विषय:- केंद्र पुरस्कृत योजनांवर झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करणेबाबत.

**प्रस्तावना :**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० मधील ३ (ड) व कलम ५ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १३० आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ५७ मधील तरतुदींनुसार जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींच्या अनुक्रमे जिल्हा निधी व ग्राम निधीत जमा रकमांचे अनुषंगाने लेखापरीक्षण करण्यात येते.

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना वाचा मधील संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयाद्वारे राज्यातील सर्व पंचायती राज संस्था व महानगरपालिकांसह सर्व नागरी संस्था यांचे लेखापरीक्षणाकरिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदींचे आधारे केंद्र पुरस्कृत योजना उदाहरणार्थ महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (MREGS), स्वच्छ भारत मिशन (SBM), राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान (NRHM) व सर्व शिक्षा अभियान इत्यादी योजनांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत करावे किंवा कसे याबाबत अधिनस्त कार्यालयांद्वारे विचारणा करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासन व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये संबंधित योजनांचे लेखापरीक्षण करण्याबाबत निर्देश नसतानाही स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारा यासंदर्भातील अभिलेख मागविण्यात येत असल्याने या संदर्भात संबंधित संस्थांद्वारे शासन स्तरावर मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. तरी या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश :**

**केंद्र पुरस्कृत योजनांबाबत जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावर प्राप्त निधीचा भरणा जिल्हा निधी अथवा ग्राम निधीत करण्यात आला असल्यास अथवा सदर योजनांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत करण्याबाबत केंद्र शासन अथवा राज्य शासनाद्वारे निर्गमित योजनांचे मार्गदर्शक सूचनांत निर्देश देण्यात आले असल्यास सदर योजनांच्या अनुषंगाने स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत लेखापरीक्षण करण्यात यावे. अन्यथा सदर योजनांचे संबंधित अभिलेख्यांची मागणी लेखापरीक्षणादरम्यान करण्यात येवू नये.**

सदर आदेशांचे काटेकोररीत्या पालन करण्यात यावे.

(सु.रा.भोसले)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१) विभागीय सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)

२) जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (सर्व)